**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४६३ /२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
श्री रविंद्र बा.खांडेकर,
उपसंपादक, दैनिक पुण्यनगरी
गुलशन आर्केड, २ रा माळा
रेल्वे स्टेशन चौक, अमरावती

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय
बुलडाणा

२. जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक (गृह)
पोलीस अधिक्षक कार्यालय,
बुलडाणा

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री शिवाजी वानखडे, A.S.I. पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा हजर आहे. श्री ए.एस.भुसारी, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) बुलडाणा हजर आहे.

अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि.१७/१/११ रोजी केलेल्या अर्जानुसार सन २००५-०६ मध्ये झालेल्या बुलडाणा पोलीस भरती निवड समितीने उमेदवारांना दिलेल्या गुणांच्या यादीची प्रमाणित प्रत व फलकावर लावण्यात आलेल्या अंतिम यादीची प्रमाणित प्रत मागितली होती. सदर माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने प्रपत्र-ब नुसार प्रथम अपील दाखल केले त्यात अपिलीय अधिकारी तथा प्र.अप्पर पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांनी५/५/११ रोजी आदेश पारीत केला. अर्जदाराचे म्हणण्यानुसार निवड समितीने घेतलेल्या मुलाखतीमध्ये उमेदवारांना दिलेल्या गुणांसंबंधीची प्रत (हस्तलिखीत) अर्जदाराला पाहीजे आहे. अर्जदाराला मिळालेल्या गुणांसंबंधी छापील यादी दिली असल्याचे सांगण्यात आले. सुनावणी दरम्यान उत्तरवादी तर्फे असे सांगण्यात आले की, हस्तलिखीत गुणांची प्रत उपलब्ध नाही. प्रथम अपीलामध्ये दि. ५/५/११ ला ठेवलेल्या सुनावणीची नोटीस अर्जदाराला दि.७/५/११ ला मिळाल्यामुळे अर्जदार प्रथम अपीलाच्या सुनावणीला हजर राहु शकले नाही त्यामुळे अर्जदाराला प्रथम अपीलामध्ये बाजु मांडण्याची संधी मिळाली नाही असे अर्जदाराने सुनावणीमध्ये आज सांगितले. वास्तविक, अर्जदाराला मुलाखतीमध्ये उमेदवारांना दिलेल्या गुणांची हस्तलिखीत प्रत पाहीजे ती उपलब्ध नाही असे उत्तरवादी यांचे म्हणणे आहे.

तेंव्हा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला तसे लेखी पत्र आठ दिवसामध्ये द्यावे व तसा अहवाल या आयोगास पाठवावा. श्री भुसारी, जन माहिती अधिकारी तथा प्र.पोलीस उपअधिक्षक (गृह) बुलडाणा यांनी तसे आज या आयोगासमोर कबुल केले त्या कारणावरुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/